web: http://navakal.org,
e-mail- info@navakal.org
वर्ष-९० | अंक-१३ | मुंबई | मंगळवार २० मार्च २०१२ | संपादक : सौ. जयश्री खाडिलकर-पांडे | पाने-८ | किंमत:₹ २
REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14

एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
एक चळवळ

## आज कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा राज्यव्यापी बंद

नाशिक, ता. १९ - कांद्याला हमीभाव मिळावा म्हणून उद्या मंगळवारी २० मार्च रोजी राज्यातील कांदाउत्पादक शेतकरी संपूर्ण राज्यभर बंद पाळणार आहेत. हे आंदोलन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्त्वाखाली होणार आहे. त्याची सुरुवात आज सोमवारपासूनच नाशिक जिल्ह्यात झाली असून नाशिक जिल्ह्यातील सर्व रस्त्यांवर कांदा उत्पादक शेतकऱ्यांची वाहने उतरली असून त्यामुळे नाशिकमधील सर्व तालुक्यांमध्ये वाहतूक विस्कळीत झाली आहे. उद्या तर हे आंदोलन आणखीन तीव्र होणार असून सर्व वाहतूक व्यवस्था कोलमडून पडणार आहे.

# ठाण्यात शिवसेनेचा रडीचा डाव

## 'स्थायी' पराभव टाळण्यासाठी महासभा बरखास्त

**ठाणे, ता. १९ - आज ठाणे महापालिकेत शिवसेनेची प्रचंड गोची झाली. त्यामुळे शिवसेनेला चक्क रडीचा डाव खेळावा लागला. आज स्थायी समितीच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत पराभव टाळण्यासाठी शिवसेनेचे महापौर हरिश्चंद्र पाटील यांनी ठाणे महापालिकेची पहिलीच महासभा तत्काळ तहकूब करून टाकली. नाहीतर आज मनसेच्या पाठिंब्यावर स्थायी समितीमध्ये काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीचे तब्बल आठ सदस्य बनले असते आणि कदाचित स्थायी समितीचे अध्यक्षपदही आघाडीने खेचून घेतले असते. त्यामुळे नामधारी महापौर शिवसेनेकडे आणि महापालिकेच्या तिजोरीची चावी हातात असलेले स्थायी समितीचे अध्यक्षपद राष्ट्रवादीकडे अशी परिस्थिती निर्माण झाली असती. म्हणूनच आज शिवसेनेने नरेश म्हस्के यांची सभागृहनेतेपदी निवड करून आजची महासभाच बरखास्त करून टाकली. त्यामुळे विरोधी पक्ष असलेल्या राष्ट्रवादीने व काँग्रेसने एकच गदारोळ घातला. आजची महासभा बरखास्त करून शिवसेनेने आजचे मरण उद्यावर ढकलले आहे.**

ठाणे महापालिकेच्या महापौरपदाच्या निवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने शिवसेनेला बिनशर्त पाठिंबा देऊन ठाण्याची सत्ता शिवसेनेच्या हाती दिली. मात्र, शिवसेनेने या उपकाराची परतफेड नाशिकमध्ये केली नाही. त्यामुळे संतापलेल्या मनसेने महापौरपदाच्या निवडणुकीत दिलेला बिनशर्त पाठिंबा आज काढून घेतला व मनसेची ताकद काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या आघाडीमागे उभी केली. त्यामुळे एका अपक्षाच्या आणि मनसेच्या सात नगरसेवकांच्या पाठिंब्यामुळे काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीचे संख्याबळ ६५ वर पोहोचले. ठाणे महापालिकेत शिवसेनेचेही ६५ एवढेच संख्याबळ आहे. सत्ताधारी व विरोधी पक्ष यांचे संख्याबळ ठाणे महापालिकेत समसमान झाल्याने स्थायी समितीमध्ये शिवसेना-भाजपाचे आठ सदस्य तर राष्ट्रवादी व काँग्रेसचे तेवढेच आठ सदस्य नियुक्त झाले असते. त्यामुळे स्थायी समितीचे अध्यक्षपद या समसमान बलाबलामुळे चिठ्ठ्या टाकून लॉटरी पद्धतीने काढावे लागले असते. त्यात शिवसेनेच्या हातून हे अध्यक्षपद जाण्याचा प्रचंड धोका होता. एकदा का स्थायी समितीचे अध्यक्षपद शिवसेनेच्या हातातून राष्ट्रवादीकडे गेले असते तर शिवसेनेची ठाण्यातील सत्ता नामधारी बनली असती आणि सत्तेच्या आर्थिक नाड्या राष्ट्रवादीच्या हातात गेल्या असत्या. त्यामुळे आज होणारी निवडणूक कुठच्याही परिस्थितीत टाळणे अपरिहार्य बनले होते.

म्हणूनच ठाण्याचे महापौर हरिश्चंद्र पाटील यांनी आजची महासभा गुंडाळण्यासाठी आणि स्थायी समितीच्या अध्यक्षपदाची निवडणूक टाळण्यासाठी थातुरमातुर कारण पुढे केले. आजच्या महासभेत स्थायी समितीचे १६ सदस्य, परिवहन समितीचे ६ सदस्य, पाच विशेष समितीवरील ९ सदस्य व वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्यांची निवड करण्यात येणार होती. मात्र, ठाणे महापालिकेत निवडून आलेल्या सर्वपक्षीय संख्याबळाची कुठलीच माहिती कोकण आयुक्तांनी आपल्याला उपलब्ध करून दिलेली नाही. त्यामुळे पक्षीय बलाबलाची अधिकृत नोंदणी झाली नसल्यामुळे आज कुठचीही निवडणूक न होता आजची महासभा बरखास्त करण्यात येत आहे, असे सांगत महापौरांनी आजची महासभाच बरखास्त करून टाकली. महापौरांच्या या कृत्यावर काँग्रेस व राष्ट्रवादी पक्षांच्या नेत्यांनी सडकून टीका केली आहे.

# आजपासून गिरणी कामगारांचे धरणे आंदोलन

## सरकारची सुडाची खेळी! आजच आरोपपत्र दाखल

मुंबई, सोमवार- गिरणी कामगारांना घर आणि जमीन मिळावी, या मागणीसाठी उद्या मंगळवार सकाळी १० वाजल्यापासून मुंबईच्या आझाद मैदानात धरणे आंदोलन सुरू होत आहे. शिवसेनेने या आंदोलनाला पूर्ण पाठिंबा दिला असून गिरणी कामगारांच्या मागण्यांबाबत शिवसेना कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांची भेट घेणार आहेत. उद्या अधिवेशनातही हा प्रश्न उपस्थित होईल, अशी अपेक्षा आहे.

सत्ताधारी काँग्रेसबरोबर आघाडीत असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षालाही गिरणी कामगारांच्या प्रश्नाबाबत आस्था आहे. गिरणी कामगारांच्या घरांबाबत गिरणी कामगार नेत्यांशी चर्चा करून लवकरात लवकर निर्णय घ्यावा, असा आग्रह राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सातत्याने करीत आहेत. मात्र, मुख्यमंत्री त्याकडे लक्ष देत नाहीत.

दरम्यान, उद्या २० मार्च रोजी गिरणी कामगारांचे आंदोलन असताना गिरणी कामगार नेत्यांना कोर्टात हजर राहायला लावून त्यांना तिथे गुंतवून ठेवायचे, असे षड्‌यंत्र करण्यात आले आहे. १ मार्च रोजी गिरणी कामगारांनी करी रोड ते गोल्ड मोहर गिरणी असा मोर्चा काढला. या मोर्चावेळी आंदोलन करणाऱ्यांना अटक करून त्यांना भोईवाडा पोलीस स्टेशनला नेण्यात आले आणि तिथेच त्यांना जामीन दिला. अशा प्रकरणात चौकशी करून कोर्टात आरोपपत्र दाखल करण्यास साधारण वर्ष लागते. मात्र भोईवाडा पोलीस ठाण्याने अचंबित करणारा वेग दाखवित केवळ १६ दिवसांत चौकशी पूर्ण केली आणि लगेच कोर्टात हजर राहण्याची नोटीस बजावली. विशेष योगायोग असा की, २० मार्च या आंदोलनाच्या दिवशीच दादर येथील मा. महानगर दंडाधिकारी यांच्यासमोर दुपारी ३ वाजता आरोपपत्र दाखल केले जाणार असून सर्वांना न्यायालयात हजर राहावे लागणार आहे.

### महाड चवदार तळ्याचा ८५ वा वर्धापनदिन

महाड, ता. १९ - समता, बंधू, एकता, स्वातंत्र्य आणि राष्ट्रीय एकात्मतेची महत्त्वपूर्ण शिकवण देत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथील चवदार तळ्याच्या ऐतिहासिक सत्याग्रह करून सामाजिक क्रांती घडवली. यामुळे महाडचे नाव इतिहासात अजरामर झाले. या घटनेला ८५ वर्षे होत असून वर्धापनदिनानिमित्त महाडमध्ये प्रचंड भीमसागर लोटला आहे. त्यांच्या सेवार्थ महाड नगरपालिका आणि स्थानिक आंबेडकरी जनतेने विशेष दखल घेतली आहे. या ऐतिहासिक घटनेचे स्मरण करून महामानवाला अभिवादन करण्यासाठी अनेक नेते उपस्थित राहणार आहेत.

# गिरणी कामगारांना मोफत घरे द्या!

## विधानसभेत गदारोळ! कामकाज बंद पाडले

मुंबई, सोमवार - गिरणी कामगारांना मोफत घरे मिळालीच पाहिजेत, या मागणीसाठी आज विधानसभेत शिवसेना-भाजपा आणि मनसेच्या आमदारांनी सरकारच्या विरोधात घोषणा देत सभागृहाचे कामकाज दोनदा बंद पाडले. विरोधक एवढ्यावरच शांत बसले नाहीत तर कागदाच्या चिटोऱ्या करून त्यांनी अध्यक्षांच्या आसनाजवळ फेकल्या. विरोधकांचा या संतप्त भावना लक्षात घेऊन दोनदा तहकूब झालेले सभागृह अखेर दिवसभरासाठी स्थगित करण्यात आले.

आज विधानसभेमध्ये राज्यपालांच्या अधिभाषणावर चर्चा सुरू असताना सरकारच्या वतीने निवेदन करताना गृहनिर्माण राज्यमंत्री सचिन अहिर यांनी

▸ पुढील मजकूर पान ४ वर

# पोलीस वसाहतीसाठी १०० कोटी देणार गृहमंत्र्यांनी आश्वासनाची पूर्तता करावी

मुंबई, सोमवार- मागील वर्षी गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी एका पोलीस वसाहतीच्या दुरवस्थेची पाहणी करताना आश्वासन दिले होते की, पोलीस कर्मचाऱ्यांच्या (अधिकारी वगळता) वसाहतीच्या दुरुस्तीसाठी १०० कोटी रुपयांचा निधी दिला जाईल आणि त्याची आगामी अर्थसंकल्पात तरतूद केली जाईल. त्यामुळे गृहमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनाची आठवण ठेवून त्याची पूर्तता आगामी अर्थसंकल्पात करावी, अशी मागणी 'नवाकाळ'ने केली आहे.

मागील वर्षी 'पोलीस वसाहतींच्या दुरवस्थेचा पर्दाफाश करणारी मोहीम दैनिक 'नवाकाळ'ने सलगपणे राबविली होती. त्यावेळी गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी या 'नवाकाळ'च्या मोहिमेची स्वत: तत्काळ दखल घेऊन एका पोलीस वसाहतीची पाहणी केली होती.

त्यावेळी गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी पोलिसांच्या कुटुंबियांना आश्वासन दिले होते की, अधिकारी वगळता सर्व पोलीस कर्मचारी राहात असलेल्या पोलीस वसाहत्यांच्या दुरुस्तीसाठी १०० कोटी रुपयांचा निधी दिला जाईल. त्याची तरतूद आगामी अर्थसंकल्पात केली जाईल, या गृहमंत्र्यांनी दिलेल्या आपल्या आश्वासनाची पूर्तता करावी, अशी मागणी 'नवाकाळ'ने केली आहे.

# मुंबई-पुणे महामार्गावर वडार समाजाचे ठिय्या आंदोलन

## जातीचा दाखला तत्काळ द्या! जात नक्की करा

पुणे, ता. १९ - वडार समाजाचा समावेश अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीमध्ये करावा, या मागणीसाठी शिवसेना नेते विजय चौगुले यांच्या नेतृत्त्वाखाली मंत्रालयावर निघालेला वडार समाजातील १०,००० लोकांचा मोर्चा पोलिसांनी तळेगाव-दाभाडे येथील मुंबई-पुणे महामार्गावर अडविला. त्यामुळे संतप्त झालेल्या वडार समाजाच्या लोकांनी महामार्गावर बसकन मारून ठिय्या आंदोलन सुरू केले. त्यामुळे वाहतुकीची प्रचंड कोंडी झाली. मात्र शासनाच्या वतीने वडार समाजाच्या नेत्यांशी बोलणी करून येत्या २६ मार्चला मंत्रालयात बैठक घेण्याचे आश्वासन देण्यात आल्याने हा मोर्चा विसर्जित करण्यात आला.

वडार समाजाचा समावेश महाराष्ट्रात 'ओबीसी' समाजात केलेला आहे. मात्र आंध्र, कर्नाटक राज्यात वडार समाजाचा समावेश 'शेड्यूल कास्ट' म्हणजेच अनुसूचित जाती-जमातीमध्ये केलेला आहे. वडार समाजाचा राहण्याचा ठिकाणा नसतो. तरीही महाराष्ट्रात त्यांच्याकडे १९६१ सालचा पुरावा सादर करू न शकल्याने वडार समाजाला सर्व सवलतींपासून वंचित राहावे लागते.

वडार समाज दगडांच्या डोंगरात राहतो. मात्र सरकारने हे दगडी डोंगर उद्योगपतींच्या खाणींच्या घशात घातले. त्यामुळे वडार समाज तेथूनही विस्तापित झाला. म्हणून वडार समाजाला राहायला गावरान जमीन किंवा डोंगर सरकारने ठरवून द्यावेत, वडार समाजाला जातीचा दाखला मिळविण्यात येणाऱ्या अडचणी सरकारने तत्काळ दूर कराव्यात, या वडार समाजांच्या महत्त्वाच्या मागण्या असल्याचे वडार समाजाचे नेते विजय चौगुले यांनी सांगितले. महाराष्ट्र सरकार दुष्काळी भागात गुरांसाठी छावण्या आणि वैरण छावण्या सुरू करते. मात्र, वडार समाजाच्या गाढवांसाठी अशा छावण्या का तयार केल्या जात नाहीत? असा सवाल विजय चौगुले यांनी विचारला.

# महाराष्ट्र पिछेहाटीवरच! सरकारने श्वेतपत्रिका काढून वस्तुस्थिती तपासावी! विनोद तावडेंचा सरकारवर हल्लाबोल

मुंबई, सोमवार - सध्या राज्य सरकार विकासाच्या बाबतीत अधिकच पिछाडीवर असून राज्य सरकारने तत्काळ श्वेतपत्रिका काढून वस्तुस्थिती तपासावी. मग त्यांना सरकारचा कारभार कळून चुकेल, असे सांगत भ्रष्टाचार, घोटाळे यांमध्ये हे सरकार अडकले आहे, असा जोरदार हल्लाबोल विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते विनोद तावडे यांनी आज सभागृहात केला.

विधान परिषदेत आज राज्यपालांच्या अभिभाषणावर अभिनंदनावर बोलण्यासाठी काही सदस्यांनी चर्चेत भाग घेतला. आ. उल्हास पवार आणि हेमंत टकले यांनी राज्यपालांच्या भाषणातील काही मुद्दे उपस्थित केले तर त्यानंतर विनोद तावडे यांनी अधिकाधिक वेळ घेऊन सरकारचे वाभाडे काढले. ते पुढे म्हणाले की, कृपाशंकर यांची संपत्ती जप्त, सुभाष घई, हिरानंदानी जमीनप्रकरणी हायकोर्टात सरकारची लक्तरे वेशीवर टांगली. म्हणून सरकारचे अभिनंदन करावे का? उद्योग-धंद्याबाबत सरकार उदासीन आहे. उद्योगपती रतन टाटा त्यांचे वारसदार सायरन मिस्त्री यांना घेऊन उद्योगधंदे टाकण्यासाठी महाराष्ट्र राज्याला भेटत नाहीत तर गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदींना भेटतात. ही परिस्थिती निर्माण का व्हावी? फोर्ड आणि वास्कोसारख्या बड्या कंपन्या करोडो रुपयांची गुंतवणूक करण्यासाठी तयार असताना त्यांना का सहकार्य करण्यात आले नाही? असा सवालही तावडे यांनी उपस्थित केला.

राज्याने जिल्ह्यातील मानव विकास अहवाल काढल्याचे सन २००६ यावर्षी ठरवले.

▸ पुढील मजकूर पान ४ वर

**शुभराशी - १,३,६**






भारत सरकार पुरस्कृत संस्थेतर्फे
१०/१२ पास नापास मुला मुलींसाठी
पाहिजेत ट्रेनी नर्सिंग असिस्टंट
शिकताना महिन्याला कमवा २,०००/- ते ३,०००/-
100 % नोकरीची लेखी हमी
पास झाल्यावर रू. ५००/- ते ८००/-
प्रति दिवस कमवा
डॉ. गायकवाड इंस्टीट्यूट (स्थापना - १९९६)
२०३, आकांक्षा, प्लाझासमोर, सिलेक्शनवरती, दादर (वेस्ट), स्टेशनजवळ २४३२६०७७ / २४३७०१५४
• मेघमहल, दत्तपाडा, बोरिवली (ईस्ट) २८७०६७३९
• ३१०, सुधांशु चेंबर्स, संतोष हॉटेलवरती, कल्याण (वेस्ट) ०२५१-२३०२९८६.
Website : www.drgaikwadinstitute.com

# नवाकाळ



GOVT. OF INDIA (PROMOTED)
FOR 10/12 PASS/FAIL
100% JOB GUARANTEE
EARN & LEARN STIPEND 35 - 40,000
SUNDAY BATCHES AVAILABLE
DIRECT 2ND YR EXAM FOR EXPERIENCED STUDENT
PRACTICAL NURSING / DMLT
EARN PER DAY
RS. 500/- TO 800/-
X-RAY / ECG /OPTOMETRY
DIETICIAN / NATURECURE / SPA
DR. GAIKWAD INSTITUTE ( Estd - 1996 )
DADAR - 203, Akanksha, Opp. Plaza Ab Selection, Dadar (West). 24367386 / 24326077
BORIVALI - Megh Mahal, Dattapada, Borivali (E). 28706739 / 64287933
KALYAN - 310, Sudhanshu Chembers, Above Santosh Hotel, Kalyan (West). 0251-2302986
Website : www.drgaikwadinstitute.com

## सुरेश जैन यांच्यावरील कारवाईविरोधात मेणबत्ती मोर्चा, शांतीपाठ व सर्वधर्म प्रार्थना

### जैन समर्थक कायदाच विसरले : अस्लम आझमी

जळगाव, ता.१९- आमदार सुरेश जैन यांना घरकुल घोटाळ्याप्रकरणी अटक करण्यात आल्यानंतर त्यांच्यावरील कारवाईच्या विरोधात आता मेणबत्ती मोर्चा, शांतीपाठ तसेच सर्वधर्म प्रार्थनेचे आयोजन करण्यात आले. समर्थकांकडून रोजच असे आंदोलन छेडले जात असताना जैन समर्थक कायदाच विसरल्याचे मत राष्ट्रीय अल्पसंख्यांक महासंघाचे अध्यक्ष अस्लम आझमी यांनी व्यक्त केले आहे.

आमदार सुरेश जैन यांना घरकूल घोटाळ्याप्रकरणी अटक करण्यात आल्यानंतर त्यांच्या समर्थक कार्यकर्ते व शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी कारवाईच्या निषेधार्थ तसेच त्यांना सोडण्यात येणार नाही, तोपर्यंत रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा ईशारा दिला आहे. त्याअंतर्गत १२ मार्च रोजी 'जिल्हा बंद' तसेच १५ मार्च रोजी प्रचंड मोर्चा काढण्यात आला आहे.

'जिल्हा बंदला' अत्यल्प प्रतिसाद मिळाला व मोर्चामध्ये फक्त जैन यांचे समर्थक होते. काहींना खेड्यावरून आणण्यात आले होते, असा आरोप करण्यात आला तसेच बंद व मोर्चे आयोजित करणे म्हणजे हा सामान्य जनतेला वेठीस धरण्याचा आणि दबावतंत्राचा वापर करण्यात येत असल्याची जोरदार टीका झाली.

त्यानंतरसुद्धा जैन समर्थक गप्प बसलेले नाहीत. कारवाईच्या विरोधात येथे पेटविलेल्या मेणबत्त्यांचा मोर्चा काढण्यात आला तसेच जैन यांच्यावरील कारवाईविरोधात प्रार्थना, शांतीजप पठ व सर्वधर्म प्रार्थनेचे आयोजन करण्यात आले.

यासंदर्भात शहरात टीकेचा सूर उमटू लागला आहे. आ. सुरेश जैन यांचे घरकूल गैरव्यवहारांच्या गुन्ह्यात संशयित आरोपींच्या यादीत नाव नसताना अटक करण्यात आल्याने समर्थक आदळआपट करीत आहेत.

तथापि सबळ पुरावे हाती लागल्यानंतरच जैन यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्यांस अटक करण्यात आल्याचे तज्ज्ञांनी म्हटले आहे. इशु सिंधु आयपीएस असलेले जबाबदार अधिकारी असल्याने त्यांनी प्रमुख सूत्रधार असलेल्या जैन यांना अटक करण्यापर्यंत मजल मारली. मात्र त्यामुळे बिथरलेले समर्थक विनाकारण रणकंदन करीत असल्याचे म्हटले जात आहे.

जैन यांच्यावरील कारवाईविरुद्ध बंद, मोर्चे काढून अथवा जप-पूजा, मंत्रपाठ व सर्वधर्म प्रार्थना करून ते कारवाईच्या कचाट्यातून सुटणार नाहीत. ते त्यात निर्दोष असतील तर आपोआपच बाहेर येतील असे लोकांचे म्हणणे आहे.

राष्ट्रीय अल्पसंख्यांक महासंघाचे अध्यक्ष अस्लम आझमी यांनी तर जैन समर्थक कायदाच विसरल्याचे वक्तव्य केले आहे. सिंधु यांनी जबाबदारी सांभाळत व कायद्याच्या चौकटीत राहून जैन यांना अटक केली. त्यामुळे समर्थकांनी विनाकारण कायदा हातात घेण्याचा प्रयत्न करू नये, असे आझमी यांनी म्हटले आहे.

कायदा व समर्थन या दोन्ही वेगवेगळ्या बाजू असल्याचे म्हणत कायदा कोणाचे समर्थन अथवा चमचेगिरी करीत नाही असे त्यांनी म्हटले आहे. घरकूल घोटाळ्यामुळे ज्येष्ठ नेत्यांचे पितळच उघडे पडल्याने जळगावच्या नागरिकांनी आता डोळे उघडावेत, असे आवाहन आझमी यांनी केले आहे.

## शिवसेना आमदार उपरकरांची पाचव्यांदा तालिका सभापतीपदी निवड

सिंधुदुर्ग, ता.१९- शिवसेना विधान परिषदेचे आमदार परशुराम उपरकर यांची सलग पाचव्यांदा विधान परिषदेच्या तालिका सभापतीपदी निवड झाली आहे. या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

आमदार उपरकर यांनी विधान परिषदेत अत्यंत मुद्देसूद प्रश्न उपस्थित करून कोकणातील प्रश्नांकडे सभागृहाचे लक्ष वेधले आहे. राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधान परिषदेचे तालिका सभापती म्हणून त्यांची अभिनंदनीय निवड झाली आहे. ते मनोरा आमदार निवास भोजन समितीचे सदस्यही आहेत. आ. उपरकर यांची विधान परिषदेची मुदत सहाव्या वर्षी संपणार असून त्यांची पुन्हा विधान विधान परिषदेवर वर्णी लागली यासाठी जिल्ह्यातील शिवसैनिकांची मागणी होत आहे.

आ. उपरकर दरवर्षी आपल्या कार्याचा अहवाल हिंदू हृदयसम्राट, शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना आवर्जून सादर करतात. त्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांना विधान परिषदेवर शिवसेनेने निवडून दिले आहे. सलग पाचव्यांदा तालिका सभापतीपदी निवड झाल्याबद्दल आ. उपरकर यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## नाशिकच्या महापौर-उपमहापौरांनी विधिवत पूजा करून पदभार स्वीकारला

नाशिक, ता. १९ - नवनिर्वाचित महापौर आणि उपमहापौर यांनी आज सकाळी विधिवत पूजाअर्चा करून आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला. पदभार स्वीकारण्यापूर्वी महापौरांच्या 'रामायण' या निवासस्थानी सत्यनारायणाची पूजा करण्यात आली. यावेळी मनसे आणि भाजपाचे पदाधिकारी तसेच नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. राज ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली लोकाभिमुख कारभार करून शहराचा उत्तम विकास करू, अशी ग्वाही पदभार स्वीकारल्यानंतर महापौरांनी दिली.

चार दिवसांपूर्वी मनसेचे ॲड.यतिन वाघ हे महापौर तर भाजपाचे सतीश कुलकर्णी यांची उपमहापौरपदी निवडून आले आहे. मनसेचा पहिला महापौर नाशिकमध्ये झाल्याने शहरातील कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला होता. आज सकाळी महापौर आणि उपमहापौर यांनी विधीवत् पूजा अर्चा करत आपपल्या पदाचा पदभार स्वीकारला.यावेळी मनसे आणि भाजपाचे सर्व नवनिर्वाचित नगरसेवक उपस्थित होते.

## कृपाशंकर सिंह यांच्या राजापूरच्या मालमत्तेतील खातेदारांची माहिती मागविली

रत्नागिरी, ता.१९- काँग्रेसचे नेते माजी मंत्री कृपाशंकर सिंह यांच्या राजापूर तालुक्यातील वाडापेठ (आडीवरे) ग्रामपंचायत हद्दीमधील मालमत्तेतील एकूण ३४ खातेदारांची सविस्तर माहिती तातडीने सादर करण्याच्या आदेशवजा सूनचा सहाय्यक पोलीस आयुक्त आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांनी वाडापेठ ग्रामपंचायतीला एका पत्रकाद्वारे दिले आहेत. यापैकी १० खातेदारांची ग्रामपंचायतीकडे उपलब्ध असलेली खात्रीदार माहिती ग्रामपंचायतीने तत्काळ दिली असून उर्वरित २४ खातेदारांची चौकशी करून उपलब्ध माहिती लवकरच संबंधित विभागाला देण्यात येईल, अशी माहिती या ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक योगेश कदम व सरपंच संजय मुडे यांनी दैनिक 'नवाकाळ'शी बोलताना दिली आहे. दरम्यान आर्थिक गुन्हा विभागाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अशोक खेडेकर यांनी ३४ खातेदारांचे वास्तवाचे ठिकाण, त्यांची वये, मोबाईल व दूरध्वनी क्रमांक आदी सविस्तर माहिती तातडीने सादर करण्यात यावी, अशी लेखी मागणी लेखी स्वरूपात केली आहे. क्रमांक ४२/१२ या गुन्ह्याच्या तपासाकामी ही माहिती मागविण्यात आली असून यामध्ये आत्माराम हरी आडीवरेकर, गणू नारायण कोरगांवकर, प्रभाकर शिवराम तेली, लक्ष्मण नारायण कोरगांवकर, रघुनाथ विठू कोरगावकर, मोहन सहदेव रूमडे, पर्शुराम सहदेव रूमडे, दामोदर सहदेव रूमडे, यशवंत सहदेव रूमडे, जयश्री कृष्णा नार्वेकर, दिपाली दीपक सातार्डेकर, सावित्री सहदेव रूमडे, अरविंद बापू जाधव, अरविंद बापू जाधव, संतोष बापू जाधव, रविंद्र बापू जाधव, प्रकाश बापू जाधव,सुरेश बापू जाधव, किर्ती भीमसेन म्हात्रे, अर्चना बापू जाधव, यशोदा बापू जाधव, रामचंद्र रावजी मोरे, सुरेश गंगाराम गुरव, मोतीराम यशवंत शेट्ये, विश्वनाथ यशवंत शेट्ये, सुनील हरी शेट्ये, नरेंद्र रघुनाथ कदम, दिगंबर रघुनाथ कदम, अरूण रघुनाथ कदम, सुलोचना रघुनाथ कदम, सुरेश रघुनाथ कदम, सुरेश दत्तात्रय शेट्ये, आनंद विष्णू शेट्ये, वासंती बापू शेट्ये, शारदा भिकू कानडे या सर्वांची सविस्तर माहिती मागविण्यात आली आहे.

## आचरा येथे रामनवमी उत्सव

मुंबई, सोमवार- सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आचरा या गावी सालाबादप्रमाणे यंदादेखील रामनवमी उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यात येणार आहे. येथे श्री रामेश्वर हा गावचा राजा समजला जातो. गुढीपाडव्यापासून एकादशीपर्यंत येथे सलग ११ दिवस रामनवमीचा उत्सव थाटात साजरा करण्यात येतो. सकाळी १० ते रात्री २ वाजेपर्यंत भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यंदा सारेगम या संगीत, शैक्षणिक माध्यमातून प्राविण्य मिळविलेल्या ७ ते १४ वयोगटातील ८ बाल कलाकारांना खास निमंत्रित करण्यात आले आहे. त्यांच्या गाण्याची मैफल ३० मार्च रोजी सायंकाळी ५ ते ८ या वेळेत होणार आहे. उत्सवाच्या अधिक माहितीसाठी रमाकांत गुळगुळे दु. क्र.,२६११६३१३ यावर संपर्क साधावा.

## फांद्या तोडताना झाडावरून पडून मृत्यू

सिंधुदुर्ग, ता.१९- मालवण तालुक्यातील कट्टा वराड येथील नंदकुमार सीताराम मयेकर (४५) हे झाडावर चढून फांद्या तोडत असताना तोल जाऊन झाडावरून पडल्याने गंभीर दुखापतीमुळे त्यांच्या जागीच मृत्यू झाला.

कावळेवाडी येथील अच्युत पोखरणकर याच्या मालकीचे झाड तोडण्यासाठी ते झाडावर चढले होते.

## नाशिकच्या शिवसेना कार्यालयात चोरी

नाशिक, ता. १९ - गुंडांनी कुठे दादागिरी केली वा कुणाच्या घरात चोरी तसेच दरोडा पडला तर त्याची दाद मागायला पोलीस ठाण्याऐवजी नागरिक प्रथम शिवसेना कार्यालयात जात असत, त्याच कार्यालयाचे कुलूप तोडून साहित्य चोरीस जाण्याचा प्रकार घडला. सदर सेना कार्यालय शालिमार चौकात आहे. कार्यालयाच्या वरच्या मजल्यावरून अज्ञात चोरट्याने पाच पंखे, कुलर, चार भोंगे, ॲम्प्लिफायर हे साहित्य चोरून नेले. भद्रकाली पोलीस अधिक तपास करत आहेत.

## पालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागाच्या कामकाजाची आता होणार झाडाझडती

मुंबई, सोमवार- मुंबईसह उपनगरातील वाढती अतिक्रमणे प्रभावीपणे रोखण्यासाठी व पालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागाला अधिक सक्षम करण्यासाठी प्रशासनाने या विभागाच्या कामकाजाची झाडाझडती घेण्याचा निर्णय घेतला आहे.

याबाबत अधिक माहिती देताना पश्चिम उपनगरे पालिका अतिक्रमण निर्मूलन विभागाच्या कार्यालयातील एका अभियंत्याने असे सांगितले की, पालिकेच्या इमारत खात्याच्या आशिर्वादाने मुंबईतील बेकायदा बांधकामांना अभय मिळते. आता ही कार्यपद्धती मोडीत काढण्याचे पाऊल अतिक्रमण निर्मूलन विभागाने उचलले आहे.

वांद्रे ते दहिसर आणि कुर्ला ते मुलुंड तसेच माहीम ते कुलाबापर्यंतच्या हद्दीत अतिक्रमण निर्मूलन विभागाची तीन कार्यालये आहेत.

या कार्यालयांच्या हद्दीत होणाऱ्या बेकायदा बांधकामांचा रिपोर्ट दररोज पालिका उपायुक्तांना कळविण्यात येईल. किती बांधकामे उभी राहिली? अशा बांधकामांवर कारवाई करण्याच्या नोटीसा बजावण्यात आल्या का? व कारवाई झाली की नाही? असा लेखी रिपोर्ट वरिष्ठांना पाठविण्यात येईल. यामुळे पालिका प्रशासनाचा शहरातील बेकायदा बांधकामांवर कारवाईद्वारे वचक ठेवता येईल. अशा पद्धतीची अंमलबजावणी अतिक्रमण निर्मूलन विभाग करणार आहे. असे येथील अभियंत्याने 'नवाकाळ'शी बोलताना सांगितले.

## वेंगुर्लेत सुरंगीच्या कळीला विक्रमी दर

वेंगुर्ले, ता. १९- अत्तर, सुवासिक तेल आणि साबण बनविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या सुरंगी झाडाच्या कळ्यांना वेंगुर्ले तालुक्यात विक्रमी दर मिळत आहे. तब्बल २६० रुपये किलो दराने ही सुरंगीची कळी खरेदी केली जाते. सुरंगीच्या झाडाखाली साड्या, चादरी वगैरेचे आच्छादन करून कळ्या पाडल्या जातात. मग त्या वाळवून विकल्या जातात.

## तहानलेल्या युवकाचा नदीत बुडून मृत्यू

कागल, ता. १९- तहान लागली म्हणून वेदगंगा नदीपात्रात उतरलेल्या १८ वर्षांच्या युवकाचा नदीत बुडून मृत्यू झाल्याची घटना सुरूपल्ली येथे घडली. रोहित उदय मोहिते असे या बुडालेल्या युवकाचे नाव आहे. तो मूळचा चिक्कोडी तालुक्यातील अक्कोळ गावचा राहणारा होता.

## शालेय पोषण आहाराप्रकरणी चौकशी म्हणजे केवळ फार्स

रत्नागिरी, ता. १९ - शालेय पोषण आहार अफरातफर प्रकरणी स्थानिक पातळीवर केवळ चौकशीचा फार्स करून हे प्रकरण अधिकारी व लोकप्रतिनिधी संगनमताने दडपण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप चिपळूण तालुक्यातील ओमळी ग्रामस्थांनी शिक्षणाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केला आहे. मुलांना शाळेची ओढ लागावी, त्यांना चांगल्या प्रतीचा आहार मिळावा यासाठी इयत्ता १ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार देण्यात येतो. शिक्षणाचा विकास व प्रसारात लोकसहभाग राहावा म्हणून शालेय व्यवस्थापन, शिक्षक व पालक समितीची स्थापना करून या समित्यांना महत्त्वपूर्ण शासकीय अधिकार देण्यात आले आहेत. मात्र मुख्याध्यापक अनंत खैर यांनी कुणालाही विश्वासात न घेता मुलांना योग्य प्रतीचा आहार न देता व गैरहजर विद्यार्थ्यांच्या शिल्लक आहारांचा धान्य, कडधान्य व इतर वेगवेगळा साठा केला.

हा प्रकार जागरूक व्यवस्थापन व शिक्षक-पालक समिती सदस्य व पालकांच्या लक्षात आल्यानंतर तो १३ ऑक्टोबर २०११ रोजी शाळेचे शिपाई संदीप भागडे यांच्या घरातून जप्त करण्यात आला. विद्यालयात धान्य साठवून ठेवण्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध असतानाही पंचनाम्यातील सर्व मालाची अफरातफर करणाच्या उद्देशाने हा सर्व साठा विद्यालयातून बाहेर काढून मुख्याध्यापकांच्या अखत्यारीत व त्यांच्या दबावाखाली काम करणाऱ्या इतर व्यक्तींच्या घरी लपविण्यात आला. मुख्याध्यापक खैर हे स्थानिक असून त्यांचा गावात दरारा आहे. त्यांनी शासनाचे सर्व नियम धाब्यावर बसवले असल्याचा आरोप या निवेदनात करण्यात आला आहे.




प्रदीप कबरे तसा नाटकातला माणूस. त्याच्या गुरू प्रोडक्शनच्या वतीने बोल बाबी बोल, मनात माझ्या, धांदलीत धांदल, माझी लाडकी, कुणासाठी कुणीतरी इथेपासून ते अलीकडच्या हॅण्डसअप नाटकांपर्यंत त्याने निर्मिती केली. अभिनेता, लेखक, दिग्दर्शक असा त्याचा प्रदीर्घ प्रवास राहिलेला आहे. या प्रवासात त्यांनी संयोजक, आयोजक अशाही जबाबदाऱ्या पार पाडलेल्या आहेत. विशेष म्हणजे, निमित्त घेऊन संगीतविषयक अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात त्याने पुढाकार घेतलेला आहे. त्यामुळेच या त्याच्या वेगळ्या प्रवासामुळे त्याचे संगीताशी घनिष्ट नाते जमलेले आहे. यातून एक वेगळा उपक्रम तुम्हा-आम्हा सर्वांना दिलासा निर्माण करणारा होणार आहे. तो म्हणजे यशवंत देव यांच्या प्रदीर्घ संगीतसेवेबद्दल, तपश्चर्येबद्दल गौरव म्हणून कोणा नव्या पण होतकरू संगीतकाराला तसेच संगीताशी संबंधित असणाऱ्या व्यक्तीला पूरस्कार दिला जावा ही संकल्पना पुढे आली. नितीन पुरंदरे हे तसे उद्योजक.वडील जगन्निवास ऊर्फ बापूसाहेब पुरंदरे यांचे आणि देवांचे घनिष्ट संबंध होते. या कुटुंबासाठी देव हे काका होते. यातूनच 'देवाशिर्वाद'हा पुरस्कार पुढे आला. अर्थात ही संकल्पना प्रदीपची आहे हे वेगळे सांगायला नको. प्रत्येक वर्षी रोख रुपये अकरा हजार आणि मानपत्र असे त्याचे स्वरूप असणार आहे. त्याचा पहिला कार्यक्रम नुकताच आरती आर्ट अकादमी, गुरू प्रोडक्शन आणि बोरिवलीतली उत्साही नाट्यपरिषद यांच्या सहकार्याने देवांच्याच गीतांवर आधारित 'स्वर आले जुळूनी'हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. आई मला मारू नकोस, कसं हो व्हायचं यांचं या चित्रपटाला संगीत देणारे श्रीहरी वझे हे या पुरस्काराचे पहिले मानकरी ठरलेले आहेत.

## भांडण सोडविण्यासाठी गेलेल्या सासूची हत्या

नवी मुंबई, ता. १९ - मुलगी आणि जावयामध्ये सुरू असलेले भांडण सोडविण्यासाठी गेलेल्या सासूची जावयानेच हत्या केल्याची घटना तळोजा येथे घडली. भरत वाघे (३०) असे आरोपी जावयाचे नाव आहे.

भरत तळोजा येथील मजदूर झोपडपट्टीत पत्नी वनिता आणि सासू लक्ष्मीचंदर सवार (५५) यांच्यासोबत राहात होता. रात्री उशिरा जेवण वाढण्यावरून भरत आणि त्याच्या पत्नीमध्ये वाद झाला. त्यावेळी भरतने मारहाण करण्यास सुरुवात केल्यामुळे सासू दोघांच्या भांडणात पडली.त्यावेळी रागाच्या भरात भरतने घरातील विळा घेऊन सासूच्या उजव्या बाजूच्या कानावर मारला.

## वेळागर समुद्रात बुडून मुंबईच्या दोन १२वीतील विद्यार्थ्यांचा मृत्यू

सिंधुदुर्ग, ता.१९- मुंबई येथून १२वीची परीक्षा देऊन सिरोज येथील वेळागर समुद्रकिनारी पर्यटनासाठी आलेल्या पाच विद्यार्थ्यांपैकी दोघांचा समुद्राच्या लाटेच्या तडाख्यात सापडून बुडून मृत्यू झाला.

मृतांमध्ये राहुल पोपट सायंबर (१८) रा. माहीम, मुंबई व ब्रिजेश नरेंद्र मेहर (१९) रा. माटुंगा, मुंबई याचा समावेश आहे.

वेंगुर्ले तालुक्यातील शिरोडा येथील मूळ रहिवासी असलेला भावेश किशोर रेडकर (१८) सध्या रा. माटुंगा, मुंबई याच्या सोबत त्याचे अन्य चार मित्र प्रथमेश मनोहर खातू (१९ रा. माटुंगा), दिलीप संतोष लाड (२१ रा. माहीम), राहुल पोपट सायंबर (१८ रा. माहीम, मुंबई) व ब्रिजेश नरेंद्र मेहर (१९ रा. माटुंगा) हे गावी आले होते.

आज ते शिरोडा वेळागर येथे भावेशच्या घराची साफसफाई करून ते समुद्रात पोहण्यासाठी उतरले होते. हे पाचही जण बुडाले, मात्र यापैकी तिघे कसेबसे बाहेर आले. त्यानंतर अन्य दोघा बुडालेल्यांचा शोध तेथील नागरिकांच्या सहाय्याने घेतला असता, ब्रिजेश याचा मृतदेह सापडला. मात्र, राहुल याच्या मृतदेहाचा शोध लागला नव्हता. यासाठी गस्ती नौकेद्वारे शोध घेण्याचे काम सुरू आहे.

Bank of India
Relationship beyond banking

**मालाड (प.) शाखा - एस. व्ही. रोड, नटराज मार्केटच्या समोर, मालाड (प.), मुंबई - ४०० ०६४.**
**दूर. : २८८२ २७६४/२८८२ ४८०६, फॅक्स : २८८२ ००९७/२८८८ २९०१.**
Email- MaladW.mumbaiNorth@bankofindia.co.in

**ताबा सूचना**
(जंगम मालमत्तेकरिता)

ज्याअर्थी अधोहस्ताक्षरीत **बँक ऑफ इंडियाचे** (आता किंवा यापुढे बँक म्हणून उल्लेखित) प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सीक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (येथे कायदा म्हणून उल्लेखित) अनुसार व सदर कायद्याच्या कलम १३(१२) सहवाचिता सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ (सदर नियम) अंतर्गत प्राप्त अधिकारान्वये कर्जदार **मे. फिलोनी इंडस्ट्रीज प्रोप्रायटर (श्री. हिरेन मनसुखलाल मेहता)** यांना थकित रक्कम **रु. ७५.०६ लाख (रु. पंच्याहत्तर लाख सहा हजार मात्र)** अधिक त्यावरील दि. **२८.१०.२०११** पासून कंत्राटी दराने पुढील व्याज अधिक प्रासंगिक खर्च, मूल्य आदी रकमेचा अंतिम प्रदानाच्या तारखेपासून **६० दिवसांच्या आत** भरणा करण्याकरिता मागणी सूचना दिनांकित **२६.१२.२०११** जारी केली होती.

कर्जदारांनी सदर रकमेचा भरणा करण्यास कसूर केली असल्याने, सदर सूचना कर्जदार व आम जनतेस देण्यात येत आहे की, अधोहस्ताक्षरितांनी सदर नियमाचे कलम सहवाचिता सदर कायद्याच्या कलम १३(४) अंतर्गत त्यांना प्राप्त अधिकारान्वये खालील निर्देशित मालमत्तेचा **दि. १६ मार्च, २०१२** रोजी ताबा घेतला आहे.

विशेषत: कर्जदार व आम जनतेस इशारा देण्यात येत आहे की, त्यांनी सदर मालमत्तेसंदर्भात व्यवहार करू नये व असे कोणतेही व्यवहार हे बँक ऑफ इंडियाच्या दि. **१६.०३.२०१२** रोजीनुसार थकित रक्कम **रु. ७९,४७,३५३/- (रु. एकोणऐंशी लाख सत्तेचाळीस हजार तीनशे त्रेपन्न मात्र)** अधिक दि. **१६.०३.२०१२** पासून कंत्राटी दराने व्याज अधिक प्रासंगिक खर्च आदी रकमेशी संबंधित असेल.

तारणगहाण मालमत्तेच्या मालकाचे नाव : **मे. फिलोनी इंडस्ट्रीज (प्रोप्रायटर श्री. हिरेन मनसुखलाल मेहता)**

**जंगम मालमत्तेचे वर्णन**

रॉ मटेरियलचा स्टॉक जसे तांबे, सोने, केमिकल, तयार वस्तू जसे विविध प्रकारच्या इमिटेशन ज्वेलरी, ऋणको/स्वीकारदार, इलेक्ट्रो प्लेटिंग प्लान्ट, अन्य उपकरणे आदी.

**सही/-**
**(एच.डी. गुप्ता)**
**प्राधिकृत अधिकारी**
**बँक ऑफ इंडिया, मालाड (प.) शाखा**

**दिनांक : १६.०३.२०१२**
**ठिकाण : मुंबई**

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
नवाकाळ
।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

# प्रादेशिक 'ममता' आणि गुजरातनु मोदी

देशाच्या राजकारणात काय किंवा समाजकारणात काय प्रत्येक राज्यातल्या स्थानिक जनतेचा प्रभाव दिसून येतो. त्या त्या राज्यातील स्थानिक प्रश्नांना वाचा फोडण्याकरिता सामाजिक पातळीवर संघटना उभ्या राहत आहेत. तर याच लोकभावनेचे भांडवल करून प्रादेशिक राजकीय पक्षांची मांदियाळीही वाढत आहे. या प्रादेशिक पक्षांचा थेट राजकारणाशी आणि सत्तेशी संबंध येत असल्यामुळे ते आपल्या ताकदीच्या जोरावर बऱ्याच गोष्टी घडवून आणतात. अशा या प्रादेशिकपणाचा प्रभाव सांगणाऱ्या दोन-चार घटना गेल्या काही दिवसांत घडल्या. रेल्वे अर्थसंकल्पामध्ये भाडेवाढ जाहीर झाली त्याचे निमित्त करून ममता बॅनर्जी यांनी रेल्वे मंत्री दिनेश त्रिवेदी यांची थेट मंत्रीपदावरूनच हकालपट्टी करण्याची मागणी केली. ही मागणी मान्य नाही झाली तर सरकारचा पाठिंबा काढून घेण्याची धमकी त्यांनी दिली. मनमोहन सिंग यांनी ममतांपुढे शरणागती पत्करली आणि दिनेश त्रिवेदींना राजीनामा देणे भाग पडले. तृणमूल काँग्रेस या प्रादेशिक पक्षाने काँग्रेससारख्या राष्ट्रीय पक्षाला गुडघे टेकायला लावले. तिकडे बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी थेट दिल्लीकरांनाच सज्जड दम भरला.दिल्लीतल्या बिहारींनी एक दिवस जरी काम थांबवले तर दिल्ली जागची हलणार नाही असा इशारा देऊन टाकला. इकडे गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी एक दिवस पुण्याच्या दौऱ्यावर आले आणि दिवसभराच्या पंधरा कार्यक्रमांमध्ये गुजरातचे कौतुक करण्याशिवाय त्यांनी दुसरे कुठले भाषणच केले नाही. या सगळ्या घटना घडत असताना नागपूरमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची अखिल भारतीय बैठक झाली. त्यात देशामध्ये वाढत असलेल्या प्रादेशिक पक्षांच्या वाढत्या प्रभावाबद्दल कपाळावर आठ्या पडणारी चिंता व्यक्त झाली. परंतु या सगळ्या घडामोडी इतक्या परस्परविरोधी आहेत की त्या देशाविषयीच्या खऱ्या चिंतेऐवजी गमतीजमतीचेच प्रदर्शन दिसून येते. कारण या सगळ्या गोष्टी जरी घडत असल्या तरी राजकारण्यांना सत्तेच्या पंक्ती एकमेकांसाठी घालाव्या लागतात आणि अनेकांना या सत्तेच्या ताटाखालचे मांजर होऊनही वावरावे लागत असते. त्यामुळे मनमोहन सिंगांचे ममतांपुढे गुडघे टेकणे काय किंवा मोदींना पाठीशी घालून प्रादेशिक वादाविरुध्द संघाने ढोंगबाजी करणे काय या गोष्टी एकाच पंक्तीत बसतात.शेवटी समाजकारणापेक्षा सत्तेसाठी पक्ष किंवा संघटना किती टोकाला जाऊन तडजोडी करतात हेच यातून दिसून येते.

### स्वत:चा जीव वाचवण्यासाठी

पूर्वीपासून आपल्याकडे एका वानरीणीची कथा सांगितली जाते. एक वानरीण आपल्या पिल्लाला डोक्यावर घेऊन नदी पार करत असते. नदीचे पाणी वाढत जाते. तसतशी त्या पिल्लाला अधिकाधिक वर धरण्याचा प्रयत्न करते. परंतु ज्यावेळेला ते पाणी तिच्या नाकातोंडात जायला लागते त्यावेळेला ती त्या पिल्लाच्या डोक्यावर पाय ठेवून आपला जीव वाचवण्यासाठी धडपडू लागते. सध्या समाजकारणाच्या डोक्यावर उभे राहून राजकारणी आपला जीव वाचवताना दिसतात. ज्या रेल्वे मंत्र्यांनी केंद्र सरकारचे जबाबदार मंत्री म्हणून रेल्वेचा अर्थसंकल्प जाहीर केला त्यांची पाठराखण करण्याऐवजी मनमोहन सिंग यांनी आपले सरकार वाचवण्यासाठी त्यांच्याच डोक्यावर पाय ठेवून सरकारचा जीव वाचवण्याचा केविलवाणा प्रयत्न केला आहे. बंगालच्या 'मिठाई'ने आपली धिटाई दाखवल्याबरोबर दिनेश त्रिवेदींविषयीची ममता संपली आणि त्यांना घरचा रस्ता दाखवला गेला. बिहारच्या मुख्यमंत्र्यांना सध्या स्वत:च्या राज्यकारभाराचा बराच अहंकार निर्माण झालेला दिसतो. त्यामुळे बिहारच्या कौतुकाचा देशभर मुक्तविहार झाला पाहिजे अशी त्यांची इच्छा दिसते. त्यांनी अशाच बिहारींच्या डोक्यावर पाय ठेवून दिल्ली ठप्प करण्याचा इशारा परस्पर देऊन टाकला पण दिल्ली ठप्प झाली तर दिल्लीतल्या बिहारींच्या पोटापाण्याचे काय याचा विचार त्यांनी केला नाही. प्रादेशिकपणाचा हा अभिमान काहीवेळेला आपल्याच राष्ट्रीयत्वाचा अपमान करणारा असतो हेही या लोकांच्या लक्षात येत नाही.गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांना देखील अशाच गुजरात अहंकाराची सूज आली आहे. उठता बसता, चालता बोलता, खाता पिता गुजरातनु गौरव याशिवाय त्यांना दुसरे काही सुचतच नाही. पुण्यामध्ये काही कार्यक्रमासाठी ते आले होते. तेव्हा प्रत्येक ठिकाणी महाराष्ट्रापेक्षा गुजरात कसा पुढे आहे हे सांगण्यातच त्यांचा दिवस संपला. त्यांना 'गुजरात फोबिया' झाला आहे असे म्हणण्याशिवाय पर्याय उरत नाही. कारण त्यांच्या या गुजरात अहंकाराचे टोकाचे स्वरूप म्हणजे अनेक वर्षे पुण्यात राहिलेल्या किंबहुना महाराष्ट्रातच आयुष्य गेलेल्या मोहन धारियांना मोदींनी तुम्ही पुणेरी असण्यापेक्षा गुजराती असल्याची आठवण करून दिली. त्यांचे हे सुरू असलेले गुजरातचे मार्केटिंग आता विनोदाचा विषय होऊ लागले आहे. त्यांनी आपल्या नावापुढे कंसात नरेंद्र मोदी गुजरात असेच शब्द वापरायला सुरुवात केली पाहिजे.

### राष्ट्रीय संघ आणि प्रादेशिक मोदी

या प्रादेशिकपणावर संघ नावाच्या राष्ट्रवादी संघटनेने चिंता व्यक्त करणारा ठराव मंजूर केला. संघाच्या या प्रतिनिधी सभा आणि त्यात होणारे हे ठराव म्हणजे दर पौर्णिमेला सत्यनारायणाचीच पूजा घालण्यासारखे म्हणावे लागेल. या सभांमध्ये चिंता व्यक्त होते आणि ठराव पारित करून सगळे प्रतिनिधी पुढच्या प्रवासाला निघून जातात. नागपूरच्या या बैठकीत देशात प्रादेशिक पक्षांचा जोर वाढत असल्याबद्दल फार मोठी चिंता संघनेत्यांनी व्यक्त केली. या चिंतेमुळे कदाचित त्यांनी एक दिवस उपोषण केले असते तर त्या चिंतेमागची तळमळ व्यक्त झाली असती परंतु नागपुरात हा ठराव पारित होत असताना संघवाल्यांची दुसरी राजधानी असलेल्या पुण्यात नरेंद्र मोदी 'गुजरातनु गौरवा'चे पोवाडे गात होते. सध्या तर मोदी हे भाजपा आणि संघाचे इतके लाडके झाले आहेत की त्यांची बढाई मारण्यात सगळेच आघाडीवर असतात. संघाला जर खरंच प्रादेशिक पक्षांविषयी चिंता वाटत असेल तर मग त्यांनी भाजपाला त्या प्रादेशिक पक्षांशी आघाडी करायला बंदी घातली पाहिजे आणि मोदींसारख्यांना गुजरातइतकेच राष्ट्रही मोठे आहे याची जाणीव करून द्यायला हवी. परंतु तसे घडणार नाही. कारण सत्ताकारणाच्या पंक्तीत संघालाही जेवण झोडायचे असते आणि अनेक ठिकाणी त्याच ताटाखालचे मांजरही व्हायचे असते.

## मुखशुद्धी

जुली फणकारतच बॉसच्या केबिन बाहेर आली,

**रिसेप्शनिस्ट :** का गं? काय झालं?

**जुली :** बॉसने विचारलं! आज ऑफिस अवर्सनंतर फ्री आहेस का? मी म्हटल हो...

**रिसेप्शनिस्ट :** वॉव, मग?

**जुली :** कसलं वॉव आणि कसलं काय, ही ५० पानं दिली टाइप करायला...

## पंचांग

**मंगळवार, २० मार्च २०१२**

शके १९३३ खरनामसंवत्सर,

* फाल्गुन कृष्ण त्रयोदशी ● **नक्षत्र:** धनिष्ठा

● रवी उदय ०६-४४, रवी अस्त १८-४९

**जन्मराशी:** ००-०१ ते २४-०० कुंभ

शिवरात्री, मधुकृष्ण त्रयोदशी

संपादक, मुद्रक, प्रकाशक व संचालक: **सौ. जयश्री खाडिलकर-पांडे**
मुद्रक-प्रकाशन स्थळ : नवाकाळ प्रेस, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगाव, मुंबई -४००००४. टेलिफोन : २३८८०९८१,
जाहिरात विभाग: २३८६०९८७,२३८४१५२४, फॅक्स नं.: २३८१०१७६
वितरण: २३८२४४६६, फॅक्स नं. : २३८६ ०९८९, २३८७ ४९११.
**कार्यकारी संपादक : रोहित पांडे**
info@navakal.org
http://navakal.org
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

## कविता — पाणी म्हणजे जीवन

थेंब थेंब साठवावा। थेंबे थेंबे तलाव भरावा।
तलावातील गाळ उपसावा। जलसाठ्यासाठी ।।१।।
लोकहो पाणी अडवा। लोकहो पाणी साठवा।
लोकहो दुष्काळ हटवा। पाणी जमिनीत जिरवा ।।२।।
आवारात तलाव बांधावे। तलावात पाणी सोडावे।
पावसाचे पाणी साठवावे। शहरी इमारतीत ।।३।।
विहिरीत कचरा टाकू नये। पाणी दूषित करू नये।
जलस्त्रोत सुकू नये। ठेवावे हेच उद्दिष्ट ।।४।।
जलसंपदा वाचवा। विहिरीचा वापर करावा।
नित्य उपसा असावा। जलशुद्धीसाठी ।।५।।
जर पाण्याचा झरा आटला। तर जीवनप्रवास संपला।
विचार हा जयांस पटला। तोच खरा माणूस ।।६।।
पाणी जपून वापरावे। तेच लोकांस सांगावे।
पाणी सर्वांस मिळावे । हाच असावा हेतू ।।७।।
बदा बदा पाणी ओतू नये। अपव्यय पाण्याचा करू नये।
थेंबही वाया दवडू नये। पाणी म्हणजे जीवन ।।८।।
पाण्याने तहान भागते। पाण्याने अन्न पिकते।
अन्नाने भूक शमते। सर्व सजीवांची ।।९।।
झाडांसाठी रोप लावता । रोपावर पाणी शिंपडता ।
रोपाचा मोठा वृक्ष होता। सावली मिळेल पांथस्था ।।१०।।
पेराल जेव्हा बीज अनेकदा। वाढेल तेव्हा वृक्षसंपदा।
वाढेल मग जलसंपदा। तसाच मिळेल प्राणवायू ।।११।।
पाणी साठवावे आपण। करावे जलसंधारण ।
करावे वृक्षारोपण। गुंतवणूक भविष्याची ।।१२।।

**- सुरेश रघुनाथ पित्रे**
ठाणे(पश्चिम).
**मोबा.: ९००४२ ३०४ ०९**

# डॉ. शिरोडकर, नवमहाराष्ट्र संघ अजिंक्य





**मुंबई, सोमवार - विलेपार्ले (पूर्व) येथील गजानन क्रीडा मंडळाच्या विद्यमाने वामन दुभाषी मैदानातील स्वर्गीय नामदेव देवजी बारे क्रीडा नगरीत संपन्न झालेल्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत महिला गटात मुंबई शहरच्या डॉ.शिरोडकर संघाने, तर पुरुष गटात मुंबई उपनगरच्या नवमहाराष्ट्र संघाने विजेतेपदाचा मान मिळविला.**

महिला गटाच्या अंतिम फेरीच्या सामन्यात चुरशीच्या लढतीत डॉ.शिरोडकरने वीरमाता जिजाऊ संघाचा २३-१६ गुणांनी पराभव केला. स्नेहल साळुंखे, मेघाली कोरगावकर, प्रज्ञा सकपाळ विजयी संघातर्फे सुरेख खेळल्या. पराभूत संघातर्फे आरती नार्वेकर, सीमा साबळे यांची झुंज एकाकी ठरली.

पुरुष गटाच्या निर्णायक लढतीत रोहित सेठच्या दमदार खेळाच्या जोरावर नवमहाराष्ट्र संघाने अंकुरचा ३९-२२ गुणांनी आरामात पराभव केला. रोहितने तुफान चढायांच्या जोरावर अंकुरचे क्षेत्ररक्षण मोडीत काढून आपल्या संघाचा विजय सुरुवातीलाच पक्का केला. त्याने एका चढाईत ३ आणि एका चढाईत ४ गडी टिपले. तर संपूर्ण सामन्यात १५पेक्षा जास्त गुणांची कमाई केली. त्याला महेश डोईफोडे, मृदुल हळदणकर यांनी छान साथ दिली. पराभूत संघाच्या अभिनव चव्हाण, राहुल चव्हाण यांनी एकाच चढाईत प्रत्येकी ३ गडी टिपले. विजेत्या संघाला २१ हजार, उपविजेत्या संघाला १५ हजार रुपये रोख आणि चषक देऊन गौरविण्यात आले. चौथ्या दिवसातील सर्वोत्तम खेळाडू म्हणून प्रमोदिनी चव्हाण (ओम नवमहाराष्ट्र) आणि निलेश चिंदरकर (उत्कर्ष) यांची निवड करण्यात आली.

स्पर्धेच्या पाच दिवसांचे सुरेख सूत्रसंचालन किशोर गावडे यांनी केले. स्पर्धेचा बक्षीस समारंभ आमदार कृष्णा हेगडे, माजी नगरसेवक ॲड.पराग आळवणी, शशिकांत पाटकर, विद्यमान नगरसेविका ज्योती आळवणी आणि मुकेश मेहता यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. मंडळाचे संचालक शंकर ऊर्फ दादा मोडक, त्यांचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी अथक मेहनत घेतली.

### नवमहाराष्ट्र संघाची जेतेपदाची हॅट्ट्रिक

गजानन क्रीडा मंडळाची स्पर्धा जिंकून बोरिवलीच्या नवमहाराष्ट्र संघाने यंदाच्या मोसमातील आपल्या विजेतेपदाची हॅट्ट्रिक पूर्ण केली. या अगोदर त्यांनी सांताक्रूझ, बोरिवली येथे झालेल्या कबड्डी स्पर्धा जिंकल्या होत्या. राज्य स्पर्धेतील यंदाचे त्यांचे पहिलेच विजेतेपद होते. महिला गटाचे जेतेपद मिळविणाऱ्या डॉ.शिरोडकर संघाचे मात्र यंदाच्या मोसमातील पहिलेच विजेतेपद होते. या अगोदर झालेल्या महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने स्पर्धेत त्यांना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते.

स्पर्धेतील पुरस्कार विजेते खेळाडू: पुरुष-अष्टपैलू-रोहित सेठ, चढाई: महेश डोईफोडे (दोघे नवमहाराष्ट्र). पकड- सुभाष साईल (अंकुर).

महिला: अष्टपैलू- पूजा केणी (महात्मा गांधी), चढाई- आरती नार्वेकर (वीरमाता जिजाऊ), पकड- नेहा कदम

# वेस्ट इंडिजचा ऑस्ट्रेलियावर सहा वर्षांनंतर पुन्हा विजय





सेंट व्हिन्सेंट, ता.१९- येथे झालेल्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात यजमान वेस्ट इंडिजने तब्बल सहा वर्षांच्या मोठ्या अवधीनंतर पुन्हा एकदा ऑस्ट्रेलियावर विजय मिळविण्यात यश मिळविले. पावसामुळे डकवर्थ लुईस नियमाच्या आधारे खेळविण्यात आलेल्या या सामन्यात वेस्ट इंडिजने ५ गडी आणि १० चेंडू राखून आरामात विजय मिळविला.

४० षटकांच्या या सामन्यात ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करताना ५ बाद १५४ धावांचीच मजल मारली. डेव्हिड हसीने सर्वाधिक ३७ धावा केल्या. विंडीजतर्फे फिरकी गोलंदाज नरीनने ४ बळी घेतले. विजयासाठी असलेल्या १५८ धावा वेस्ट इंडिजने ३८.२ षटकांत ५ गडी गमावून सहज पूर्ण केल्या. त्यांची सलामी चांगली झाली नाही. पॉवेलला ब्रेट लीने भोपळा न फोडताच तंबूत धाडले. परंतु त्यानंतर सॅम्युअल्स आणि चार्ल्स यांनी दुसऱ्या विकेटसाठी ४२ धावांची भागिदारी करून विंडीजचा डाव सावरला. मग अष्टपैलू पोलार्ड आणि ब्राव्हो यांनी चौथ्या विकेटसाठी अर्धशतकी भागिदारी करून विंडीज विजयावर शिक्कामोर्तब केले. पोलार्डने सर्वाधिक ४७ धावा पटकावल्या. त्याने ६१ चेंडू खेळताना ४ चौकार मारले. डी. ब्राव्होने ३० धावांची सुरेख खेळी केली. सामनावीर पुरस्कार ४ बळी घेणाऱ्या नरीनला देण्यात आला.

## मुंबई लंगडी संघटनेची अस्थायी समिती स्थापन

मुंबई, सोमवार - मुंबई लंगडी संघटनेची सन २०१२-१३ साठीची अस्थायी समितीची स्थापना राज्य लंगडी असोसिएशनतर्फे अमरहिंद मंडळात झालेल्या सभेत करण्यात आली. सदर समिती मुंबई जिल्ह्यातील लंगडी खेळाची जोपासना करेल, जिल्हा पंच परीक्षा घेईल, घटना तयार करेल, नियमित स्पर्धा घेण्यासाठी प्रयत्न करणार आहे. ही समिती १ वर्षासाठी असून त्यानंतर निवडणूक घेण्यात येणार आहे. या सभेला लंगडी फेडरेशनचे सचिव सुरेश गांधी आणि राज्य लंगडी असोसिएशनचे सचिव चेतन पागवाड उपस्थित होते.

अस्थायी समिती पुढीलप्रमाणे: अध्यक्ष- संजय बाबुराव शेटचे, उपाध्यक्ष: दिनेश सुखानंदी, कार्याध्यक्ष- अरुण अनंत देशपांडे, कार्योपाध्यक्ष- सुनील पूर्णपात्रे, मा.कार्यवाह-अरुण देशमुख, सहकार्यवाह- सुरेंद्र विश्वकर्मा, सत्यवान जाधव, राजेंद्र शेळके. खजिनदार- मोहन हरिश्चंद्र पाटील. सदस्य- बाळासाहेब तोरसकर, संतोष काशिनाथ मोरे. सल्लागार- गोरक्ष पारगावकर, आनंद हरी गोखले, रमेश वरळीकर.

# आता सारेकाही श्रीलंकेच्या हातात

**एशिया कप**

मिरपूर, ता.१९- येथे सुरू असलेल्या एशिया चषक क्रिकेट स्पर्धेत महेंद्रसिंग धोनीचा भारतीय संघ या स्पर्धेची अंतिम फेरी गाठणार की नाही याचा फैसला आता श्रीलंकेच्या महेला जयवर्धनेच्या हातात आहे. उद्या या स्पर्धेतील शेवटची साखळी लढत यजमान बांगलादेश आणि श्रीलंकन संघात होत आहे.

श्रीलंकन संघाने आपल्या सलामीच्या दोन्ही लढती गमावल्या असून त्यांनी जरी उद्याची लढत जिंकली, तरी त्याचा विशेष फायदा त्यांना होणार नाही. परंतु भारतीय संघाला मात्र मग अंतिम फेरीत पुन्हा एकदा पाकिस्तानशी दोन हात करण्याची संधी मिळेल. यजमान बांगलादेशला सलामीच्या लढतीत पाकिस्तानने नमविले होते. परंतु दुसऱ्या सामन्यात त्यांनी बलाढ्य भारतीय संघाला पराभूत करून स्पर्धेत खळबळ माजविली होती. त्याचबरोबर अंतिम फेरीतील प्रवेश करण्याच्या आपल्या आशा कायम ठेवल्या आहेत. उद्याची त्यांनी लढत जिंकली तर पुन्हा एकदा पाकिस्तानबरोबर अंतिम फेरीत दोन हात करण्याची संधी बांगलादेशला मिळेल. या स्पर्धेत झालेल्या दोन्ही सामन्यांत बांगलादेशने चांगली कामगिरी केली आहे. आता हा देश लिंबूटिंबू राहिला नसल्याचे दाखवून दिले आहे. पाकिस्तान विरुद्धच्या सामन्यात दैवाची थोडी साथ त्यांना मिळाली असती तर तोही सामना कदाचित बांगलादेशने जिंकला असता. त्यांची गोलंदाजी चांगली असून फलंदाजांनी जर आपली कामगिरी चोख पार पाडली, तर लंकेविरुद्ध त्यांना विजय मिळविण्यास फार जड जाणार नाही. त्यामानाने 'ट्राय सीरिज' स्पर्धेत चमक दाखविणाऱ्या श्रीलंकेने मात्र खराब कामगिरी केली आहे. दोन्ही सामने त्यांनी गमावले.

आम्ही उद्याचा सामना जिंकण्यासाठीच प्रयत्न करू, असे बांगलादेशचा कर्णधार रहिमने सांगितले. आणखी एक धक्का या स्पर्धेत श्रीलंकेला देऊन अंतिम फेरीत प्रवेश करण्याचा मानस त्याने व्यक्त केला.

## मनोगत

### काका कंपनीने पुतण्यांच्या वर्चस्वाचा विचार करावा

मध्यंतरी मुंडे काका-पुतण्याचा वाद गाजला होता. यापूर्वीही दोन बड्या राजकीय काका-पुतण्यांचा वाद असाच गाजला होता. परंतु या सर्व काका-पुतण्यांच्या वादात काकापेक्षा पुतण्याच सवाई असल्याचे दिसून आले आहे. इतिहासामध्ये पुतण्याला ''काका मला वाचवा'' असे म्हणण्याची वेळ आली होती. परंतु सध्याच्या राजकारणात काकालाच ''पुतण्या मला वाचव'' असे म्हणण्याची वेळ काकांवर आली आहे. याचा अर्थ काकांचे एकूण राजकारण जनतेला मान्य नाही असाच लावायचा की काकांभोवती असलेले बडवे पुतण्याला मान्य नाहीत असा लावायचा? सर्व काका कंपनीने पुतण्यांच्या या वर्चस्वाचा गंभीरपणे विचार करावा व तिजोरीच्या चाव्या आता पुतण्यांकडे सोपवून आपण (राजकारण) संन्यास घ्यावा, हेच उत्तम.

**- रामचंद्र साटम, (प्राचार्य)**
अवधूत टाईपरायटिंग इन्स्टिट्यूट,
एस. टी. स्टॅन्डसमोर, कणकवली,
जिल्हा- सिंधुदुर्ग- ४१६६०२.




नवाकाळ

मुंबई, मंगळवार २० मार्च, २०१२ पान – ८




# सुपारी तोडायचे मशीन तयार

(सौ. जयश्री खाडिलकर-पांडे)

अमोल घोंगडे हा मुळचा बुलढाण्याचा आहे. तिथे सुपारीचे एकही झाड नसावे. पण शिकण्यासाठी अमोल दापोलीच्या कृषी विद्यापीठात दाखल झाला आणि दुसऱ्याच वर्षी त्याने केवळ ३०० रुपयांत तयार होणारे सुपारी झाडावरून तोडायचे स्वस्त व मस्त मशीन तयार केले आहे. सुपारीच्या निमुळत्या खोडाच्या झाडावर चढायला कुशल मजूर लागतो. जो मिळणे कठीण होत चालले आहे, शिवाय या मजुराला दिवसाचे २५० रुपये मजुरी




सुपारी तोडण्याचे मशीन

द्यावी लागते. एका दिवसात हा मजूर ३५ झाडांवर चढून सुपारी काढतो. पण मशीन वापरले तर त्याच्या दुप्पट झाडांवरील सुपारी निघते. शिवाय मशीनची एकदा ३०० रुपये किंमत मोजली की रोजची मजुरी द्यावी लागत नाही.

झाडाच्या भोवती बसणाऱ्या कडीला कोयता जोडून त्या कोयत्याला १० फूट लांब पीव्हीसी पाइप इतके हे साधे यंत्र आहे. ही कडी झाडाच्या बुंध्यावरून वरपर्यंत सरकवली जाते आणि मग जमिनीवरून कोयत्याला जोडलेला पाइप योग्य तऱ्हेने हालवून सुपारी तोडल्या जातात. दापोली कृषी विद्यापीठाने मान्यता दिल्यावर व्यापारी तत्त्वावर याचे उत्पादन होऊ शकते.

(उद्या वाचा: स्टॅप्लरची गंमत)

# उन्हाळ्यात महागाईचे चटके

## भाज्या कडाडल्या, मासे महागले

मुंबई, सोमवार– उन्हाळ्याला सुरुवात झाल्यानंतर महागाईचे चटके सर्वसामान्यांना बसायला सुरुवात झाली आहे. भाज्यांचे भाव कडाडले असून माशांची आवक कमी झाल्याने त्यांचे भावही वाढले आहेत. त्यामुळे आता जेवण काय करायचे? असा सर्वसामान्यांना प्रश्न पडला आहे.

भाज्यांच्या किमती ३० ते ४० रुपये प्रति किलो गेल्या आठवड्यात होत्या. त्यांच्या किमतीत सुमारे दुप्पट वाढ झाली असून बऱ्याचशा भाज्या ८० रुपये किलो झाल्या आहेत. वांगी ३० ते ४० रुपये किलो होती. आता वांगी ६० रुपये किलो, तर भेंडी, दोडका, काकडी ८० रुपये किलो झाली आहे. कोबी ३० रुपये, तर मटार ४५ रुपये किलो आहे. फ्लॉवरही ७० रुपये किलो झाला आहे. भाजी महागली म्हणून मासे खावेत तर माशांच्या किमतीत भरमसाट वाढ झाली आहे.

उन्हाळा आणि प्रदूषणामुळे माशांची आवक कमी झाली आहे. त्यामुळे मासेही खूप महागले असून मोठे मासे खाणे सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर झाले आहे. उन्हाळ्यात महागाईचे चटके सामान्यांना चांगले बसणार असून पेट्रोल, डिझेल आणि गॅसच्या किमती वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मुंबई महानगरपालिका पाणीपट्टीत वाढ करण्याची शक्यता वर्तविली जात आहे. झोपडीसाठी ५० पैसे, वसाहतींसाठी १ रुपया तर औद्योगिक वापराच्या पाणीपट्टीत ५ रुपये प्रति हजार लिटर पाण्यामागे वाढविले जाणार आहे. पाणीपट्टीत, सांडपाण्याचा कर जोडण्याचा पालिकेचा विचार असल्याने मुंबईकरांचे पाणी महाग होणार आहे.

# रेल्वे मंत्र्यांच्या राजीनाम्याबद्दल पंतप्रधानांना अतीव दु:ख

नवी दिल्ली, ता. १९ – रेल्वेमंत्री दिनेश त्रिवेदी यांनी आपल्या रेल्वेमंत्रीपदाचा राजानामा दिल्याचे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी आज लोकसभेत जाहीर केले. त्रिवेदी यांच्या राजीनाम्यामुळे आपल्याला अतीव दु:ख झाल्याचेही पंतप्रधानांनी लोकसभेत सांगितले. दिनेश त्रिवेदी यांचा राजीनामा मंजुरीसाठी राष्ट्रपतींकडे पाठविण्यात आला आहे. तो मंजूर होताच तृणमूल काँग्रेसचे राज्यमंत्री मुकुल रॉय यांना केबिनेट मंत्रीपद देऊन त्यांना रेल्वेमंत्रीपद देण्यात येईल. मात्र, दिनेश त्रिवेदी यांना ज्या अपमानास्पदरित्या राजीनामा द्यावा लागला, त्याबद्दल मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने व भाजपाने सरकारवर कडक शब्दांत टीका केली.










